आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
शुक्रवार दिनांक २५ एप्रिल २०२५

<u>ठळक बातम्या</u>

1. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर सुरक्षा दलांची शोधमोहीम जारी/ लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी काश्मीरात दाखल.
2. अखिल भारतीय नाट्यपरिषदेच्या शतकी विभागीय नाट्य संमेलनाचे उद्घाटन उद्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नागपुरात होणार.
3. ज्येष्ठ शास्त्रज्ञ आणि इस्रोचे माजी अध्यक्ष के.कस्तुरीरंगन यांचं निधन.
4. विदर्भाच्या अनेक जिल्ह्यात उद्या आणि पर्वा वादळी पर्जन्यमानाचा इशारा.

<u>पहलगाम</u>

पहलगाम दहशतवादी हल्ल्याशी संबंध असलेल्या लष्कर-ए-तैय्यबाच्या तीन दहशतवाद्यांची माहिती देणाऱ्यांना एकूण ६० लाख रुपयांचं बक्षीस पोलिसांनी जाहीर केलं आहे. या दहशतवाद्यांवर प्रत्येकी वीस लाखांचं इनाम पोलिसांनी ठेवलं आहे. पोलिसांनी तिन्ही संशयित हल्लेखोरांची रेखाचित्रं जारी केली आहेत.

लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी आज सकाळी श्रीनगरला पोहचले. लेफ्टनंट गव्हर्नर मनोज सिन्हा यांनी आज श्रीनगरमधील राजभवन येथे लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांच्यासोबत सुरक्षा आढावा बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवले. यावेळी श्रीनगरस्थित लष्कराच्या अधिकाऱ्यांनी त्यांना एकूण सुरक्षा परिस्थिती आणि भारतीय हद्दीत दहशतवाद्यांवर केलेल्या कारवाई तसेच नियंत्रण रेषेवर पाकिस्तानी सैन्याने केलेल्या युद्धबंदीचे उल्लंघन करण्याच्या प्रयत्नांची माहिती दिली. पहलगाम दहशतवादी हल्ल्याबद्दल निषेधाचे पडसाद देशभरात अजूनही ठळकपणे उमटत आहेत. अनेक ठिकाणी नागरिकांनी उत्फूर्तपणे दहशतवादाचा निषेध करत मोर्चे काढले तर अनेक ठिकाणी उत्स्फूर्तपणे बंद पाळण्यात आला. दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ यवतमाळ मध्ये मुस्लिम बांधवांनी हाताला काळी पट्टी बांधून केले नमाज पठण केलं. दरम्यान, पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तान विरोधात केंद्रसरकारनं जाहीर केलेल्या उपाययोजनांतर्गत, विसा रद्द करण्याची तरतूद पाकिस्तानच्या हिंदू धर्मीय नागरिकांना लागू होणार नाही, असं केंद्रसरकारनं स्पष्ट केलं आहे.

*पहलगाम कश्मीर में जिस तरीके से बेगुनाह लोगों को आतंकी द्वारा मारा गया। हम उसकी मजम्मत करते हैं इसलिए आज सभी इस्लाम धर्मी मुस्लिम समाज के लोगों ने जुम्मे के दिन काली पट्टी बांध कर नमाज़ अदा की और जो लोग उसमें घायल हुए जो अपनी ज़िन्दगी और मौत की लड़ाई लड़ रहे हैं उनके लिए दुआ की गई की अल्लाह उनको जल्द से जल्द शिफा अदा करें।*

<u>राहुल गांधी</u>

२२ एप्रिल रोजी पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर विरोधी पक्षनेते आणि ज्येष्ठ काँग्रेस नेते राहुल यांनी आज जम्मू आणि काश्मीरचे उपराज्यपाल मनोज सिन्हा आणि मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांची भेट घेतली आणि दहशतवादा विरोधी लढ्यात सरकारला सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले.

*Every single Indian stands united, stands together so that we can defeat what the terrorists were trying to do. It's sad to see that some people are attacking my brothers and sisters from Kashmir in the rest of the country and I think its very important that all of us stand together, stand united and fight this nasty action that has been taken and defeat terrorism once and for all.*

त्यांनी पहलगाम हल्ल्यात जखमी झालेल्यांचीही भेट घेतली आणि त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली.

<u>हवाई क्षेत्र</u>

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत - पाकिस्तानमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, भारतीय विमान कंपन्यांना पाकिस्तानच्या हवाई क्षेत्राचा वापर करण्यास बंदी घालणार असल्याचं पाकिस्ताननं म्हटलं आहे. त्यामुळे भारतातील नोंदणीकृत विमानं तसंच भारतीय कंपन्यांच्या मालकीची किंवा भाडेतत्त्वावर घेतलेली विमानं पाकिस्तानच्या हवाई क्षेत्राचा वापर करू शकणार नाहीत. उत्तर अमेरिका, ब्रिटन, युरोप आणि मध्य पूर्वेकडची एअर इंडियाची काही उड्डाणं पर्यायी विस्तारित मार्गानं जातील, असं एअर इंडियानं म्हटलं आहे.

पर्यटक सुखरूप

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर गेल्या २ दिवसात महाराष्ट्रातले सुमारे ५०० पर्यटक राज्यात सुखरूप परतले आहेत. राज्य सरकारनं या पर्यटकांसाठी दोन विशेष विमानांची व्यवस्था केली होती, त्यातून १८४ पर्यटक काल मुंबईत दाखल झाले. आणखी २३२ प्रवाशांसाठी आज एका विशेष विमानाची व्यवस्था राज्य सरकारनं केली आहे. काश्मिरमध्ये अडकलेल्या महाराष्ट्राच्या पर्यटकांना परत आणण्यासाठी मंत्रालय, मुख्यमंत्री कार्यालय आणि महाराष्ट्र सदनातला कक्ष अशी त्रिस्तरीय यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे

वेव्हज २०२५

जागतिक ऑडिओ-व्हिज्युअल आणि मनोरंजन क्षेत्रातली वेव्हज २०२५ परिषद येत्या एक ते चार मे या कालावधीत मुंबईत, बीकेसी इथल्या जिओ वर्ल्ड सेंटर इथं होत आहे. या परिषदेचं उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. या परिषदेत जगभरातून १०० पेक्षा जास्त देश सहभागी होणार आहेत. ओटीटी, **ॲ**निमेशन, गेमिंग, व्हीएफएक्स, चित्रपट, संगीत आणि डिजिटल मीडिया या सर्वच क्षेत्रात देश प्रगती करत आहे. या पार्श्वभूमीवर वेव्हज् परिषदेचं आयोजन होत आहे.

पोप फ्रान्सिस

पोप फ्रान्सिस यांच्या अंत्यसंस्कारात सहभागी होण्यासाठी आणि भारत सरकार आणि जनतेच्या वतीनं शोक व्यक्त करण्यासाठी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून दोन दिवसांच्या व्हॅटिकन सिटी दौऱ्यावर रवाना झाल्या. केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री किरेन रिजिजू आणि राज्यमंत्री जॉर्ज कुरियन तसंच गोवा विधानसभेचे उपाध्यक्ष जोशुआ डिसूझा त्यांच्या सोबत आहेत. राष्ट्रपती मुर्मू व्हॅटिकन सिटीमधील सेंट पीटरच्या बॅसिलिका इथं पोप फ्रान्सिस यांच्या पार्थिवावर पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहतील. उद्या त्या जगभरातल्या मान्यवरांसह पोप यांच्या अंत्यसंस्कार कार्यक्रमात सहभागी होतील. यामुळे देशभरात उद्या दुखवटा पाळण्यात येणार आहे. पोप फ्रान्सिस यांचं २१ एप्रिलला व्हॅटिकनच्या कासा सांता मार्टा इथल्या त्यांच्या निवासस्थानी वयाच्या ८८ व्या वर्षी निधन झालं.

विभागीय मराठी नाट्यसंमेलन

अखिल भारतीय नाट्यपरिषदेच्या शतकी विभागीय नाट्य संमेलनाचे उद्घाटन उद्या 26 एप्रिल रोजी सकाळी 11 वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी कार्यक्रमाध्यक्ष म्हणून पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि संमेलनाध्यक्ष डॉ. जब्बार पटेल यांची उपस्थिती राहणार आहे. रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट सभागृहात सुरू असलेल्या अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या विभागीय मराठी नाट्यसंमेलनाच्या उद्घाटनाला राज्यमंत्री आशिष जयस्वाल, बालरंगभूमी परिषद, मुंबईच्या अध्यक्ष ॲड. नीलम शिर्के-सामंत,यांची देखील उपस्थिती राहील. तत्पूर्वी, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या शतकी विभागीय मराठी नाट्य संमेलनाच्या निमित्ताने पूर्वसंध्येला आयोजित डॉ. गिरीश गांधी गौरवार्थ राज्यस्तरीय रात्रकालीन एकांकिका स्पर्धेत ठाण्याच्या नाट्यपरिवार संस्थेने सादर केलेल्या 'इथे चुल कुणी मोडू नये' या एकांकिकेने बाजी मारली.

डॉ.के.कस्तुरीरंगन

इस्रो अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे माजी अध्यक्ष डॉक्टर कृष्णस्वामी कस्तुरीरंगन यांचं आज बेंगळुरू इथे त्यांच्या राहत्या घरी निधन झालं. ते ८४ वर्षांचे होते. ते १९९४ पासून २००३ पर्यंत इस्रोचे प्रमुख म्हणून कार्यरत होते. कस्तुरीरंगन यांनी पीएसएलव्हीच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावली.तसंच, त्यांच्या कार्यकाळात चांद्रयानासारख्या मोठ्या मोहिमांचं नियोजन करण्याची सुरुवात झाली होती. निवृत्तीनंतर त्यांनी जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे कुलपती आणि कर्नाटक ज्ञान आयोगाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी काम पाहिलं. उच्च शिक्षण, तंत्रज्ञान आणि पर्यावरणासारख्या विविध विषयांवर सल्लागार म्हणून त्यांनी काम केलं होतं. त्यांच्या योगदानासाठी त्यांना पद्म श्री, पद्मभूषण आणि पद्मविभूषण या नागरी सन्मानांनी गौरवण्यात आलं होतं. डॉ. कस्तुरीरंगन यांनी मुंबई विद्यापीठातून भौतिकशास्त्रात पदवी आणि पदव्युत्तर पदवी घेतली होती. १९७१ मध्ये अहमदाबाद येथील भौतिक संशोधन प्रयोगशाळेत काम करताना प्रायोगिक उच्च ऊर्जा खगोलशास्त्र या विषयात त्यांनी डॉक्टरेट मिळवली होती. डॉ.कस्तुरीरंगन यांनी इस्रोचे प्रमुख म्हणून भारताच्या अंतराळ कार्यक्रमाच्या उत्क्रांतीत महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी राष्ट्रीय शिक्षण धोरण तयार करण्यासाठी जे काम केलं, त्यामुळे पुढच्या पिढीच्या जडणघडणीसाठी उपयुक्त ठरत असल्याची भावना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आपल्या शोकसंदेशात व्यक्त केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही कस्तुरीरंगन यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

## महाराष्ट्र गौरव रथयात्रा

राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने महाराष्ट्र गौरव रथयात्रेची सुरवात राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांच्या हस्ते झाली. संयुक्त महाराष्ट्र स्थापनेला ६५ वर्ष पूर्ण होत असल्याने महाराष्ट्र गौरव रथयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील पाच विभागातून मुंबईत होणाऱ्या महाराष्ट्र महोत्सवासाठी महाराष्ट्रासह विदर्भातील नागपूर, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर, अमरावती, बुलढाणा, वाशिम, यवतमाळ, अकोला, वर्धा या जिल्ह्यातील महामानवांच्या कार्याने पावन झालेल्या महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून नद्यांचे पाणी आणि माती या रथावरील मंगलकलशामध्ये गोळा करण्यात येणार आहे. हे मंगलकलश १ मे पूर्वी मुंबईत आणले जाणार आहेत.

## ओलाइलेक्ट्रॉनिक्स मोबीलिटी

राज्यातल्या ओला इलेक्ट्रॉनिक्स मोबीलिटी लिमिटेडच्या दुकानांवर प्रादेशिक परिवहन कार्यालय - आरटीओनं कारवाई केली आहे. व्यवसाय प्रमाणपत्रशिवाय किंवा एकाच ट्रेंड प्रमाणपत्राच्या आधारे अनेक दुकानं थाटल्या प्रकरणी ही कारवाई करण्यात आली. या कारावाईदरम्यान, राज्यभरातली ट्रेड प्रमाणपत्रांशिवाय सुरू असलेली ओलाची १२१ दुकानं तत्काळ बंद करण्याच्या सूचना आर टी ओने केल्या आहेत. यासाठी आतापर्यंत ओला कंपनीला १०९ कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या असल्याचं आरटीओ कार्यालयानं म्हटलं आहे.

## दर्शन सोहळा

४८ वर्षांच्या कालावधीनंतर श्री साईबाबांच्या मूळ चामड्याच्या पादुकेचा भव्य दर्शन सोहळा नागपूर येथील वर्धा रोड येथील श्री साई मंदिर येथे आयोजित करण्यात येत आहे.

## महावितरण

महावितरण कंपनीचे मनुष्यबळ विभागाचे संचालक म्हणून राजेंद्र पवार यांनी आज कार्यभार स्वीकारला.

## हवामान

विदर्भातील नागपूर, वर्धा, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये उद्या विजयांच्या कडकडाटासह वादळी पर्जन्यमान राहण्याचा इशारा नागपूरच्या प्रादेशिक हवामान केंद्राने दिला आहे. तर उद्या अकोल्यात मात्र उष्णतेची लाट कायम राहणार आहे. परवा अकोला आणि बुलढाणा वगळता संपूर्ण विदर्भात वादळी पर्जन्यमान राहण्याचा इशारा नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने दिला आहे. परवा चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात

गारपिटीची देखील शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.  दरम्यान आज नागपूर वर्धा चंद्रपूर अकोला या ठिकाणी उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला होता, त्यानुसार अकोला जिल्ह्यात सर्वाधिक 45.2 अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली आहे. तर चंद्रपूर इथं 45 अंश सेल्सिअस नागपूर आणि  यवतमाळ इथं  44.4 तर अमरावती इथं  44.29 सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद झाली आहे.

*****